# विधानभवन परिसरातील मार्ग मोकळा

## मेट्रो ३ साठी चार वर्षांपासून होता बंद

म. टा. खास प्रतिनिधी



**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भूमिगत 'मेट्रो ३'च्या कामासाठी अनेक ठिकाणे रस्ते बंद करून ठेवण्यात आले आहेत. काही ठिकाणी रस्त्यांवर मर्यादा आहेत. हे रस्ते आता झपाट्याने मोकळे आणि पूर्ववत होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामध्ये दक्षिण मुंबईतील व्हीव्ही मार्ग रस्त्याचा समावेश आहे. हा रस्ता पूर्ववत करण्यात आल्याने विधानभवन परिसरातील वाहतूककोंडीपासून प्रवाशांची मुक्तता होणार आहे.

'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' ही ३२.५ किमी लांबीची मेट्रो राज्यातील पहिली भूमिगत मार्गिका आहे. ३२.५ किलोमीटरच्या या मेट्रोवरील स्थानकांची उभारणी जमिनीच्या खाली सुमारे २० मीटर खोलीवर सुरू आहे. जमिनीच्या खाली स्थानकांची उभारणी करण्यासाठी त्यावरील रस्ता खोदावा लागला. त्यासाठीच अनेक रस्ते एकतर बंद आहेत किंवा त्यावर तात्पुरते लोखंडी आच्छादान बसविण्यात आले आहेत. जमिनीखाली हे काम सुरू असल्यानेच अनेक रस्ते अरुंद झाले आहेत. या मार्गिकेची उभारणी झपाट्याने पूर्णत्वाकडे जात असल्याने रस्ते मोकळे करण्यास सुरुवात झाली आहे.

ही मार्गिका उभ्या करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडनुसार (एमएमआरसी), अलीकडेच व्हीव्ही मार्ग रस्ता सर्वसामान्य वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. भूमिगत विधानभवन स्थानकासाठी २०१८ पासून हा रस्ता बंद करण्यात आला होता. तो पूर्ववत झाल्याने विधानभवनाकडून कुलाब्याकडे जाणारी वाहतूक सुरळीत झाली आहे. विधानभवन हे या मार्गिकेतील दुसऱ्या टप्प्यातील स्थानक असून, हा टप्पा डिसेंबर २०२४ पर्यंत सुरू होणार आहे.

मेट्रो-३ चा पहिला टप्पा सारिपूतनगर (आरे) ते बीकेसी असा असून तो डिसेंबर २०२३ पासून सुरू होणार आहे. त्यामुळे या टप्प्यातील स्थानकांच्या डोक्यावरील रस्ते पूर्ववत करण्यास सुरुवात झाली आहे. त्यामध्येच सीप्झ, एमआयडीसी व बीकेसी या तीन प्रमुख स्थानकांचा समावेश आहे. या तिन्ही स्थानकांची कामे पूर्ण झाली आहेत. अद्याप रस्ता पूर्ण सुरळीत झाला नसला, तरी रस्त्यावर भराव टाकण्याचे काम सुरू झाले आहे. मेट्रो-३ साठी २०१६ पासून रस्ते बंद करण्यास सुरुवात झाली होती. डिसेंबर २०२३ मध्ये पहिला टप्पा सुरू झाला की दुसरा टप्पा (बीकेसी दक्षिण ते कफ परेड) डिसेंबर २०२४ मध्ये सुरू होणार आहे. जून २०२४ पर्यंत रस्ते सुरळीत केले जाणार आहेत.